## ग्राहकांसाठी नोटीस (दिनांक : १० जानेवारी, २०२४)

# दिनांक ३१-०३-२०२० पासून शून्य शिल्लक असलेले निष्क्रिय खाते बंद करण्यात येणार आहेत.

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, बँक ग्राहकांचे केवायसीचे अद्ययावतीकरण करण्याच्या प्रक्रियेत आहे. तसेच बँक अशा जुन्या ग्राहकांशी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे ज्यांचे बँकेकडे बचत व चालू खाते आहेत परंतु सदर खाते ग्राहकांनी बरेच काळापासून वापरली नाहीत.

वरील दुहेरी उद्दिष्टांचा एक भाग म्हणून, बँकेने शून्य शिल्लक असलेली आणि ३१.०३.२०२० पासून निष्क्रिय (इनऑपरेटिव्ह) असलेली खाती ओळखली आहेत. त्या सर्व ग्राहकांना संपर्क साधून त्यांचे खाते सक्रिय (ऑपरेटिव्ह) करण्यासाठी बँक सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. (संबंधित ग्राहकांची खात्यासहितची यादी शाखांमध्ये उपलब्ध केलेली आहे).

हे अशा सर्व ग्राहकांना सूचित करण्यासाठी आहे की आम्ही आपले खाते सक्रिय करून घेणेसाठी उत्सुक आहोत. जे ग्राहक त्यांच्या शून्य शिल्लकेच्या निष्क्रिय खात्यांना सक्रिय करू इच्छितात त्यांना या नोटीसद्वारे विनंती करीत आहोत कि हि नोटीस दिल्याच्या ३० दिवसांच्या आत संबंधित / जवळच्या शाखेशी संपर्क करून आपल्या खात्याची केवायसी अद्ययावत करावी आणि खाते सक्रिय करून घ्यावे.

जे खाते दिनांक ९ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत सक्रिय होणार नाहीत ते खाते बंद केले जातील याची नोंद घ्यावी. सदर खाते पुन्हा सुरु करता येणार नाहीत.

**प्रशासकीय आदेशावरून.......**

Always with you...